| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय<br>रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे<br>फोननं. ०२२-२९४५१००१<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in | |

प्रेसनोट क्रमांक :- १०८-२२ दिनांक :- १९/०४/२०२२

# रात्रीच्यावेळी बंद कंपनीमध्ये घरफोडी करणाऱ्या व चोरीचा माल विकत घेणाऱ्या आरोपींना अटक करुन ०६ लाख ४० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत-वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेची कामगिरी.

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक-१०/०४/२०२२ रोजी रात्री १०.०० वा. ते दिनांक ११/४/२०२२ रोजीचे सकाळी ०३.०० वा. चे सुमारास हर्षिद पॉलीमर डिस्ट्रीब्युटर नामक कंपनीचे लॉक तोडुन कंपनीमध्ये प्रवेश करुन ०६,४०,८००/- रुपये किंमतीचे ॲल्युमिनिमचे सर्कल चोरी झाले होते. त्याबाबत अज्ञात आरोपींविरुध्द वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. I ४०१/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध होवून सदरचा गुन्हा उघडकीस येण्याच्या अनुषंगाने वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंलमदार यांनी घटनास्थळास भेट देवून घटनास्थळावरील पुरावे तसेच गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे तपास करुन कंपनीत चोरी करणारे आरोपीत नामे. १) रामलाल उर्फ शशी देवनाथ राजभर २) अन्वरअली मोहम्मद ईस्माईल शेख ३) अनिस मुस्तकीन शहा ४) सलमान उर्फ मोहम्मद अस्लम मोहम्मद अली खान सर्व रा.कामण, वसई पुर्व व चोरीचा माल विकत घेणारे ५) ईशादअली जिमकंद खान ६) भावेश शंकरलाल शर्मा दोन्ही रा. साकीनाका, अंधेरी, मुंबई यांना दिनांक १४/०४/२०२२ अटक करण्यात येवून त्यांना मा. न्यायालयात हजर केले असता दिनांक १९/०४/२०२२ रोजी पावेतो पोलीस कोठडी देण्यात आली होती. पोलीस कोठडी दरम्यान सदर आरोपीतांकडून **गुन्हयातील ०६,४०,८००/- रुपये किंमतीचा माल व गुन्हयात वापरण्यात आलेले ३,००,०००/- रु.किं. पिकअप टेम्पो असा एकुण ९,४०,८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, पोना. सचिन दोरकर, सतिष गांगुर्डे, पो.अंम. गजानन गरीबे, सुर्यकांत मुंढे, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

